**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

ॲफी.जन.१/परिपत्रक/२०२५-२६/ 2536

दिनांक : २०/०३/२०२६

# परिपत्रक

**विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य**

विषय : विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील संलग्नता विभागातील परिपत्रके व सूचनांची नियमित नोंद घेणे व त्यानुसार कार्यवाही करणे बाबत

महोदय / महोदया,

सदर परिपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व संचलित तसेच संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, महाविद्यालयांच्या संदर्भात वेळोवेळी घेण्यात आलेले निर्णय, जारी करण्यात आलेली परिपत्रके तसेच इतर आवश्यक सूचना या संलग्नता विभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात.

उक्त परिपत्रके व सूचना या विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील संलग्नता विभागाच्या (Affiliation Section) फोल्डरमध्ये नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येत असून, त्याची नोंद घेणे ही संबंधित महाविद्यालयांची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने, सर्व प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांनी आपल्या अधिनस्त कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन संलग्नता विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रके, आदेश व सूचनांची नोंद घेणे तसेच त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे बंधनकारक आहे, याची खात्री करावी.

या प्रकरणी, जर कोणतीही महत्त्वाची बाब महाविद्यालय प्रशासनाकडून नोंदविली गेली नाही व त्यामुळे महाविद्यालय अथवा विद्यार्थिनींवर प्रतिकूल परिणाम झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय प्रशासनाची राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**विद्यापीठ संकेतस्थळ : www.sndt.ac.in** वरील सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे, ही सूचना.

**आपला विश्वासू,**

**(डॉ. हिम्मत जाधव)**
**अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा**
**संलग्नता विभाग (अतिरीक्त भार)**

प्रत: श्री. कासले, वेब डिझाईनर, जुहू आवार, सदर परिपत्रक विद्यापीठ वेबसाईट वर संलग्नता विभागाच्या फोल्डर मध्ये प्रसिद्ध करावी

*F:\Mansi Affiliation\Circular\Marathi circular.docx*